६ पुढारी MY कोल्हापूर बुधवार, १० जुलै २०२४

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची 'वन कॅडेट वन ट्री' अंतर्गत अनोखी पदभ्रमंती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विवेकानंद महाविद्यालयातील पाच महाराष्ट्र बटालियनमार्फत राबविण्यात आलेल्या पर्यावरण संवर्धन 'वन कॅडेट वन ट्री' संकल्पनेनुसार पर्यावरणीय अनोखी पदभ्रमंती आयोजित करण्यात आली.

पदभ्रमंती अतिग्रे व आरती या दोन्हीच्या सीमेवर असणाऱ्या जल विभाजक रामलिंग अल्लम प्रभू व धुळोबा डोंगरावर करण्यात आली. पदभ्रमंतीमध्ये वृक्ष लागवड, जलकोश भरण व धार्मिक स्थळावरील कचरा संकलन या गोष्टी करण्यात आल्या. शंभर वृक्षांच्या पायालगत जल पुनर्रोपणासाठी दगडांची रचना करण्यात आली. पदभ्रमंतीमध्ये ३५ किलोमीटरचे अंतर विद्यार्थ्यांनी पूर्ण केले. धार्मिक स्थळावरील पर्यटकांनी केलेल्या कचऱ्याचे संकलन करण्यात आले.

10/07/2024

10.7.24